# मेट्रो-3 डब्यांचे काम फ्रेंच कंपनीला

## २४८ युनिट भारतातच तयार होणार

मुंबई, ता. १९ : मुंबईतील कुलाबा ते सिप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचे डबे तयार करण्याचे काम फ्रान्सच्या 'अॅलस्टॉम' या विख्यात कंपनीला देण्यात आले आहे. विशेष म्हणजे 'मेक इन इंडिया'नुसार हे डबे भारतातच तयार होतील.

या भुयारी मार्गावर तब्बल आठ डब्यांच्या ३१ मेट्रोगाड्या धावणार आहेत. त्यांचे २४८ डबे तयार केले जातील. अन्य काही शहरांमधील मेट्रोचे डबे तयार करण्याचे काम चिनी कंपनीला दिल्याच्या पार्श्वभूमीवर हे काम फ्रान्सच्या कंपनीला मिळाले आहे. निविदांमध्ये सर्वोत्तम ठरल्याने अॅलस्टॉमला हे काम देण्यात आले आहे.

डब्यांचा आराखडा तयार करण्यापासून ते प्रत्यक्ष रेल्वेमार्गावर जुळणी करण्यापर्यंतच्या कामाचे हे कंत्राट आहे. सध्या सुरू असलेली वर्सोवा-घाटकोपर ही मेट्रो चार डब्यांची आहे; पण कुलाबा सिप्झ मेट्रो आठ डब्यांची असून डब्यांची रुंदी ३.२ मीटर असेल. १८० मीटर लांबीच्या या मेट्रो रेल्वेत एकूण दोन हजार ३५० प्रवासी सामावून घेतले जातील (प्रत्येक चौरस मीटरमध्ये सहा प्रवासी). अंधेरी मेट्रोप्रमाणे येथेही कडेला बसण्याच्या जागा असतील व प्रत्येक डब्यात तीनशे प्रवासी मावतील. प्रत्येक डब्याला दोन्ही बाजूंना प्रत्येकी चार दारे असतील. या डब्यांचे आयुष्य ३५ वर्षे असेल. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक डब्यात सीसी टीव्हीद्वारे देखरेख केली जाईल.



### विनाचालकही!

**ही मेट्रो चालकाशिवाय चालवता येऊ शकेल, अशा तंत्रज्ञानाने युक्त असेल. प्रत्यक्षात ती चालक चालवेल की संगणकाच्या साह्याने चालवायची, याचा निर्णय नंतर घेतला जाणार आहे.**